गट-ब संवर्गातून गट-अ संवर्गातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व तत्सम रिक्त पदांवर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन आदेश क्रमांक-मबाआ-२०२६/प्र.क्र.११२/का-७
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरू चौक,मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ३१ ऑगस्ट, २०२६.

शासन आदेश:-

महिला व बाल विकास विभागातील खालील अधिकाऱ्यांना गट-ब संवर्गातून गट-अ संवर्गातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना), जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मवबावि) जि.प., सहायक आयुक्त, परिविक्षा अधिक्षक (गट-अ) (वेतनस्तर S-२० : ५६१००-१७७५००) या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

अ .क्र.	अधिका-याचे नांव व सध्या धारण करीत असलेले पद , ठिकाण	शेरा
१	२	३
१	श्री.टी.व्ही.पौनीकर, जि.म.बा. वर्ग-२, गोंदिया, जि. गोंदिया	दि. २५.५.२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
२	श्रीम. वै. वि. दाभाडे, बा. वि. प्र. अ. (ग्रा.) भिवंडी-२ जि. ठाणे.	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
३	श्रीम. आ. तु. गांगुर्डे, बा. वि. प्र. अ. (ग्रा.) मनमाड (निफाड), जि. नाशिक	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
४	श्री.प्र. बा. बागल, बा.वि. प्र.अ.(ग्रा), माणगांव, जि.रायगड	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
५	श्री. स. सं. नवले, बा. वि. प्र. अ. (ग्रा.) तासगाव, जि. सांगली	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
६	श्री. अ. द. मेरगळ, बा.वि.प्र.अ. (ग्रा.) दर्यापूर, जि.अमरावती	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
७	श्री. ना. रा. परांडे, बा.वि.प्र.अ. (ग्रा.), उमरखेड (ग्रा), जि.यवतमाळ	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
८	श्री. नि. श्री. लुंगे, बा.वि.प्र.अ. (ग्रा.) कारंजा (लाड), जि. वाशिम	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
९	श्री. बा.ज्ञा. कोरे, अधिक्षक, शासकीय विद्या महिला वसतीगृह, लातूर, जि.लातूर	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
१०	श्री. उ. मा. मुदखेडे, बा.वि.प्र.अ. (ग्रा.) देगलुर, जि. नांदेड	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
११	श्री. आ.अ. जाधव, जि.म.बा.वि.अ., विभागीय कार्यालय, अमरावती	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
१२	श्री. ग.आ.चाटे, पुणे अधिक्षक, शा.पं.ज.ने.उ.केंद्र मुलांचे निरीक्षणगृह/ विशेषगृह, येरवाडा, पुणे	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत

अ .क्र.	अधिका-याचे नांव व सध्या धारण करीत असलेले पद , ठिकाण	शेरा
१	२	३
१३	श्री. सा.व. वाघ, बा.वि.प्र.अ. (ग्रा), तळोदा, जि. नंदुरबार	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
१४	श्री. स. अ. काळे, बा.वि.प्र. अ. (ग्रा), दौंड-२, जि. पुणे	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
१५	श्री. लिं. मा. राजुरे, बा.वि.प्र. अ. (ग्रा), कंधार जि. नांदेड	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
१६	श्री का. अ. बडे, बा.वि.प्र. अ. (ग्रा), परळी, जि.बीड	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
१७	श्री.शि.मा.वने, बा.वि.प्र.अ. (ग्रा.), सिल्लोड-२, जि. छत्रपती संभाजीनगर **(दिव्यांग)**	दिव्यांग जेष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र (अंतर्गत परिवर्तनाने दिव्यांग प्रकार क)
१८	श्री. ध. सु. गीराम, बा.वि.प्र. अ. (ग्रा), मुळशी, जि. पुणे	सेवाजेष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नत
१९	श्री. द. प्र. वाघमारे, बा.वि.प्र. अ. (ग्रा), जालना-२, जि. जालना	सेवाजेष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नत
२०	श्री.कि. चं. सुर्यवंशी, बा.वि.प्र. अ. (ग्रा) करमाळा, जि. सोलापूर	सेवाजेष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नत
२१	श्री. स. भा. शिंदे, बा.वि.प्र. अ. (ग्रा) नाशिक, जि. नाशिक	सेवाजेष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नत
२२	श्री. कु.सु. धुमाळ, सहायक आयुक्त, पुणे महानगरपालिका, जि.पुणे (प्रतिनियुक्ती)	सेवाजेष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नत

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग,कार्यासन-१६-ब यांच्या शा.नि.दि.०७.०५.२०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

३. सदर पदोन्नती नियमित पदोन्नती कोटयातील रिक्त पदांवर तसेच प्रतिनियुक्तीने रिक्त झालेल्या पदावर तदर्थ पदोन्नतीने खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) सदरची तदर्थ पदोन्नती अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून लोकहितास्तव देण्यात आली आहे.

२) दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-अ व गट-ब पदांवर पदोन्नतीबाबत सा.प्र.वि/१६-अ यांनी दि.२०.४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांनुसार मान्यता देण्यात येत आहे.

३) सदरची पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या / तदर्थ स्वरूपाची असल्याने या तात्पुरती/ तदर्थ पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.

४) वरील अधिकाऱ्यांची पदोन्नती ही गट-अ संवर्गाच्या अंतिम जेष्ठतेच्या व त्यामध्ये होणा-या बदलांच्या अधीन राहील व या पदोन्नतीमुळे वरील अधिकारी यांना सदर पदोन्नतीच्या दिनांकापासून जेष्ठतेचा हक्क मागता येणार नाही.

५) सदर अधिकाऱ्यांना देण्यात आलेली तात्पुरती / तदर्थ पदोन्नती कोणतीही पूर्व सूचना वा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

४. सदर पदोन्नत अधिकाऱ्यांचे पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८३११४३९१३२६३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASAD VINAYAKRAO KULKARNI

Digitally signed by PRASAD VINAYAKRAO KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=83b8be9eb843dd6eccbd6aa4f9eecd0b5f7aca67ff32b2eef7b9ed2d85ab9442, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7D19730DDF785210D50C28934B75E9B7B4F5DD6B6181CF1901CE48EC9E3985, cn=PRASAD VINAYAKRAO KULKARNI
Date: 2026.08.31 15:33:53 +05'30'

(प्र.वि.कुलकर्णी)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

आयुक्त,महिला व बाल विकास,पुणे
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, (कार्यासन-१२) मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (म.व बा.वि.वि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (म.व बा.वि.वि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव (म.व बा.वि.वि),यांचे स्वीय सहाय्यक,मुंबई
संबंधित विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग (आयुक्तालय, पुणे मार्फत).
महालेखापाल १/२(लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरिक्षा),मुंबई/नागपूर (आयुक्तालय,पुणे मार्फत).
संबंधित अधिदान व लेखाधिकारी / जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालय, पुणे मार्फत).
संबंधित अधिकारी, (आयुक्तालय, पुणे मार्फत).
निवड नस्ती ,कार्यासन ७ महिला व बाल विकास विभाग.